विस्तार अधिकारी (पंचायत /सक) या पदावर
पदोन्नती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-२/ 48 /२०२५
अहिल्यानगर दि. 03/ 07/ २०२५

वाचा -१. महा.जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ८(२)
२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/का-१२ दिनांक ०१/०८/२०१९
३. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१
४. पदोन्नती निवड समिती जि.प.अहिल्यानगर मंजुर इतिवृत्त दिनांक ०१/०७/२०२५

या जिल्हा परिषदे अंतर्गत सध्या कार्यरत असणा-या खालील ग्रामविकास अधिकारी (ग्रामपंचायत अधिकारी) (कार्यकारी आणि ग्रामविस्तार (वर्ग-३) यांना विस्तार अधिकारी (पं/सक) (वर्ग-३) या पदावर संदर्भ क्र.४ अन्वये दि.०१/०७/२०२५ रोजी झालेल्या पदोन्नती निवड समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तातील निवडसुचीनुसार वेतनस्तर एस-१४ रु.३८६००-१२२८००/- मध्ये त्यांच्या नावासमोर रकाना नं. ६ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी तात्पुरती पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे. पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्र.३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात येत आहे.

| अ. क्र. | ग्रामविकास अधिकारी (ग्रामपंचायत अधिकारी) यांचे नाव | सध्याचे कार्यालय | प्रवर्ग | निवड केलेला प्रवर्ग | पदस्थापनेचे पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | गिऱ्हे संजय छबु | राहाता | भज-ब. | ज्येष्ठतेनुसार | पंचायत समिती पाथर्डी |
| २ | कराळे दिलीप पाराजी | राहाता | खुला. | ज्येष्ठतेनुसार | पंचायत समिती कर्जत |
| ३ | धाकतोडे विजय लक्ष्मण | श्रीरामपूर | अ.जाती. | ज्येष्ठतेनुसार | पंचायत समिती अकोले |

अटी व शर्ती -

१) सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात पदोन्नती देणेत येत आहे.

२) सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

३) शासन निर्णय दिनांक ०१/०४/२०१०, दिनांक ०२/०३/२०१९ व शासन परिपत्रक दिनांक २८/०७/२०१४ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

४) नेमणूकीचे ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५) संबधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने १५ दिवसाचे आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे अन्यथा सेवा जेष्ठता डावलली जाईल.

६) सदरचे आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 2025070306008[illegible] असा आहे.

(आनंद भंडारी भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

संबंधित ग्रामविकास अधिकारी, (ग्रामपंचायत अधिकारी) पंचायत समिती राहाता / श्रीरामपूर

व्दारा व प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहाता / श्रीरामपूर

२/- उक्त नमुद केले प्रमाणेआपले कार्यालयाचे अधिनिस्त कार्यरत ग्रामविकास अधिकारी (ग्रामपंचायत अधिकारी) यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणेकामी त्यांचेकडील कार्यभारासंबधी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करणेत यावे.

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी /कर्जत / अकोले
प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत:- निवड नस्ती.

(आनंद भंडारी भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर